**ठळक बातम्या**

- स्वामित्व योजनेअंतर्गत ६५ लाख प्रॉपर्टी कार्डांचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते दूरस्थ पद्धतीने वितरण

- संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन येत्या ३१ जानेवारीपासून/ निर्मला सीतारामन १ फेब्रुवारीला सादर करणार सलग ८वा अर्थसंकल्प

- दिल्ली विधानसभा निवडणुकीत ७० जागांसाठी एकूण १ हजार पाचशे २१ उमेदवार अर्ज दाखल

- मुंबईकरांचा प्रवास सुसह्य करण्यासाठी सर्वसमावेशक मंचाची निर्मिती

**आणि**

- भारतीय खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत चिराग शेट्टी आणि सात्विक साईराज रांकीरेड्डी जोडीचा पुरुष दुहेरीच्या उपांत्य फेरीत प्रवेश

**<><><><><>**

स्वामित्व योजनेअंतर्गत गाव पातळीवर जमिनीच्या मालकी हक्कांविषयी संपूर्ण माहिती देणाऱ्या ई प्रॉपर्टी कार्डाचं वितरण आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झालं. या कार्यक्रमात देशभरातली दहा राज्यं आणि दोन केंद्रशासित प्रदेशातल्या पन्नास हजाराहून अधिक गावांतल्या ६५ लाख ई-प्रॉपर्टी कार्डस् प्रधानमंत्र्यांच्या हस्ते वितरित करण्यात आली. यावेळी प्रधानमंत्र्यांनी ठिकठिकाणच्या लाभार्थ्यांशी दूरस्थ पद्धतीने संवाद साधला.

**होल्ड बाईट - प्रधानमंत्री**

छत्रपती संभाजीनगर इथं जिल्हाधिकारी कार्यालयात तसंच प्रत्येक तालुका मुख्यालयात हा कार्यक्रम पाहण्याची सोय उपलब्ध करुन दिली होती. जिल्ह्यात ९२५ गावांपैकी ७२७ गावांमध्ये या योजनेअंतर्गत मालमत्तांची मोजणी पूर्ण झाली असून, एक लाख १३ हजार प्रॉपर्टी कार्डसचं वितरणही करण्यात आलं. जमीन मालकाला त्याच्या जमिनीची कायदेशीर सनद मिळवून देणे हा या योजनेचा उद्देश आहे. या योजनेअंतर्गत आतापर्यंत ३ लाख १७ हजार गावांमध्ये ड्रोन सर्वेक्षण पूर्ण झालं झालं आहे. दीड लाखांपेक्षा जास्त गावांसाठी सव्वा दोन कोटी मालमत्ता कार्ड तयार करण्यात आली आहेत. पुद्दुचेरी, अंदमान आणि निकोबार, त्रिपुरा, गोवा, उत्तराखंड आणि हरियाणामध्ये ही योजना पूर्ण झालं आहे.

**<><><><><>**

संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन येत्या ३१ जानेवारीपासून सुरू होत आहे. दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीसमोर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणानं अधिवेशनाला प्रारंभ होईल. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन एक फेब्रुवारी रोजी केंद्रीय अर्थसंकल्प सादर करणार आहेत. हा त्यांचा सलग ८वा अर्थसंकल्प असून तो एक विक्रम आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा पहिला टप्पा १३ फेब्रुवारी पर्यंत चालेल, त्यात ९ बैठका होतील. यादरम्यान प्रधानमंत्री नरेंद्र मोदी राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रस्तावावर चर्चेला आणि अर्थमंत्री सीतारामन अर्थसंकल्पावरच्या चर्चेला उत्तर देतील.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या आकाशवाणीच्या ‘मन की बात’ या कार्यक्रमातून देशविदेशात राहणाऱ्या भारतीयांसमोर आपले विचार मांडणार आहेत. हा या कार्यक्रमाचा एकशे अठरावा (११८) भाग आहे. हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्या तसंच ए आय आर चे संकेतस्थळ आणि न्यूज ऑन

एआयआर या मोबाईल ॲप वरून प्रसारित केला जाणार आहे. त्याशिवाय हा कार्यक्रम एआयआर न्यूज, डीडी न्यूज, प्रधानमंत्री कार्यलय तसंच माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या युट्युब वाहिनीवरूनही थेट प्रसारित केला जाणार आहे.

**<><><><><>**

दिल्ली विधानसभा निवडणुकीत ७० जागांसाठी एकूण १ हजार पाचशे २१ उमेदवारांनी अर्ज दाखल केले असल्याची माहिती निवडणूक आयोगानं दिली आहे. अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी ६८० उमेदवारी अर्ज दाखल झाले. आज उमेदवारी अर्जांची छाननी होईल, तर येत्या २० जानेवारी पर्यंत अर्ज मागे घेता येणार आहेत.

नवी दिल्ली विधानसभा मतदारसंघासाठी एकूण २९ उमेदवारांचे सर्वाधिक ४० उमेदवारी अर्ज दाखल झाले असल्याचं निवडणूक आयोगानं कळवलं आहे. या मतदारसंघातून आम आदमी पक्षाचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांच्याविरोधात भाजपचे परवेश वर्मा आणि काँग्रेसचे संदीप दीक्षित यांनी अर्ज दाखल केला आहे. दिल्लीच्या विद्यमान मुख्यमंत्री आतिशी यांच्या विरोधात भाजपचे रमेश बिधूडी आणि काँग्रेसच्या अलका लांबा यांनी अर्ज दाखल केला आहे.

**<><><><><>**

संयुक्त संसदीय समिती वक्फ दुरुस्ती विधेयक २०२४ वर आज बिहारमध्ये पाटणा इथे चर्चा करणार आहे. ज्येष्ठ खासदार जगदंबिका पाल यांच्या अध्यक्षतेखालील समिती राज्यातल्या शिया आणि सुन्नी वक्फ बोर्डाच्या प्रतिनिधींशी चर्चा करणार आहे. देशभरातल्या लाखो नोंदणीकृत वक्फ मालमत्तेचं व्यवस्थापन करणाऱ्या वक्फ कायद्यातल्या प्रस्तावित सुधारणांवर ही चर्चा होणार आहे. येत्या २१ तारखेपर्यंत संसदीय समिती कोलकाता आणि लखनौलाही चर्चेसाठी जाणार आहे.

**<><><><><>**

सक्तवसुली संचालनालयानं कर्नाटकातल्या मैसुरू शहर विकास प्राधिकरण प्रकरणी ३०० कोटी रुपये किमतीच्या १४२ स्थावर मालमत्ता जप्त केल्या आहेत. प्राधिकरणाने केलेल्या जमीन वाटपात भ्रष्टाचार झाल्याच्या आरोपांच्या तपासाचा भाग म्हणून ईडीने ही कारवाई केली आहे. मैसुरू शहर विकास प्राधिकरणानं १४ जमिनी सिद्धरामय्या यांच्या पत्नी बी. एम. पार्वती यांच्या नावे केल्याचा आरोप आहे.

**<><><><><>**

मुंबईकरांचा प्रवास सुसह्य करण्यासाठी एक सर्वसमावेशक मंच विकसित केल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. मुंबईत सह्याद्री अतिथीगृहात रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याबरोबर झालेल्या बैठकीनंतर ते वार्ताहरांशी बोलत होते.

**होल्ड... बाईटः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

या ॲप्लिकेशनवर लोकांना आपल्या प्रवासाची आखणी करता येईल, तसंच सर्वात जवळचं स्थानक आणि प्रवासाच्या साधनाची माहितीही आर्टिफिशल इंटेलिजन्सद्वारे त्यांना मिळू शकेल. या मंचाद्वारे लाखो मुंबईकरांचा प्रवास सुकर होईल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

तंत्रज्ञानाच्या वापरामुळे आरोग्य क्षेत्रात क्रांती घडणार आहे, असं प्रतिपादन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. वांद्रे कुर्ला संकुलातील जिओ कन्व्हेन्शन सेंटरमध्ये आयोजित 'पॅन आयआयटी वर्ल्ड ऑफ टेक्नॉलॉजी २०२५' परिषदेच्या उद्घाटन सत्रात ते आज बोलत होते. ग्रामीण आणि दुर्गम भागात

डॉक्टरांना पोहोचणं शक्य नसतं तिथले रुग्ण तंत्रज्ञानाच्या माध्यमातून डॉक्टरांपर्यंत पोहोचू शकरणार आहेत, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

गड किल्ल्यांवरील अतिक्रमण काढण्यासाठी आणि रोखण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात जिल्हास्तरीय समिती गठित केल्याची माहिती महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी आज दिली. ते मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. राज्यातले किल्ले आणि गडावर अतिक्रमण होत असल्याचं सरकारच्या निदर्शनास आलं होतं. त्यामुळे मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनुसार ही समिती गठित करण्यात आली आहे.

**<><><><><>**

नवी दिल्ली इथं सुरु असलेल्या खो-खो विश्वचषक स्पर्धेत भारतीय पुरुष आणि महिला संघानं उपांत्यफेरीत धडक मारली आहे. पुरुष संघानं श्रीलंका संघावर १००-४० अशी मात केली. रामजी कश्यप कालच्या सामन्याचा सर्वोत्तम खेळाडू ठरला तर व्ही सुब्रमणी उत्कृष्ट चढाईचा मानकरी ठरला. प्रियंका इंगळेच्या नेतृत्वाखालील महिला संघानं बांग्लादेश संघावर १०९-१६ असा विजय मिळवला. कालच्या सामन्यासाठी अश्विनी शिंदे सर्वोत्तम खेळाडू आणि ऋतुराणी सेन उत्कृष्ट बचाव खेळाडू ठरली.

**<><><><><>**

महिला क्रिकेटमधे १९ वर्षांखालील ट्वेंटी- ट्वेंटी विश्वकरंडक स्पर्धेला आजपासून मलेशिया इथं सुरूवात होत आहे. यामध्ये १९ संघ सहभागी होत आहेत. या संघाची चार गटात विभागणी केली असून, भारताच्या गटात मलेशिया, श्रीलंका, वेस्टइंडिज हे संघ आहेत. भारताचा पहिला गटसाखळी सामना उद्या वेस्टइंडिजबरोबर होणार आहे. आज सहा साखळी सामने होणार आहेत.

<><><><><>

भारतीय खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष दुहेरीच्या उपांत्य फेरीत भारताच्या चिराग शेट्टी आणि सात्विकराज रंकीरेड्डी यांचा सामना मलेशियाचे गो झे फेई आणि नूर इज्जुद्दीन यांच्याशी आज संध्याकाळी होणार आहे. त्याआधी भारतीय जोड़ीनं दक्षिण कोरियाच्या जिन योंग आणि कांग मीन ह्युक यांचा उप उपांत्य फेरीत २१-१०, २१-१७ असा पराभव केला होता. दरम्यान, या  स्पर्धेत इतर प्रकारातलं भारताचं आव्हान संपुष्टात आलं आहे.

<><><><><>

ऑस्ट्रेलियन खुल्या टेनिस स्पर्धेत, पुरुषांच्या दुहेरीत भारताच्या के. एन बालाजी आणि त्याच्या मेक्सिकन साथीदाराचा पराभव झाला. पोर्तुगालच्या जोडीनं त्यांना ७-६, ४-६, ६-३ असं  पराभूत केलं. महिलांच्या एकेरी सामन्यात  दुसरे मानांकन प्राप्त पोलंडची टेनिसपटू इगा स्वियाटेक हिने ब्रिटनच्या एम्मा राडुकानू चा ६-१, ६-० असं पराभूत करून चौथ्या फेरीत प्रवेश केला. पुरुष एकेरीत, जगात अव्वल स्थानी असलेल्या इटलीच्या जेनिक सिनरचा सामना आज अमेरिकेच्या मार्कोस गिरोन याच्यासोबत होणार आहे.

<><><><><>

अमेरिकेत दक्षिण कॅलिफोर्नियात लॉस एंजेल्स भागात लागलेल्या वणव्यात किमान २७ जणांचा मृत्यू झाला.  आठवडाभराहून अधिक काळ लागलेल्या आगीत १२ हजार ३०० हून जास्त इमारती उध्वस्त झाल्या.कॅलिफोर्नियाच्या जंगल आणि अग्निशमन विभागानं दिलेल्या माहितीनुसार २२ टक्के भागातल्या आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आलं आहे.

//<><><><><>//